मा. कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत जाँच फार्म -I)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा):लातूर **P.S.**(ठाणे): गांधी चौकी **Year** (वर्ष): 2021

**FIR No.**(प्रथम खबर 0342 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 30/06/2021 19:24 वजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day** दरमियानी दिन **Date From** (दिनांक 29/06/2021 **Date To** ( दिनांक पर्यंत):30/06/2021

**Time Period** (कालावधी): **Time From** 11:50 वजे **Time To** (वेळेपर्यंत): 12:00 वजे

**(b) Information received at P.S.** (माहिती मिळालेले **Date** (दिनांक ): 30/06/2021 **Time** (वेळ): 19:01 वजे

**(c) General Diary Reference** (रोजनामचा **Entry No.** (नोंद क्र.): 031 **Date & Time** (दिनांक आणि वेळ)30/06/2021 19:01 वजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): Oral

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1. **(a) Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशापूर्व, 01 किमी **Beat No.** (बिट क्र.):

**(b) Address** (पत्ता):महावितरण कार्यालय लातूर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे **District(State)** (जिल्हा

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): मिलींद ज्ञानोबा कांबळे

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1974 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी.

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving**

| **S.No.**(अ.क्र.) | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

| **S.No.**(अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बौध्द नगर, लातूर ,गांधी चौकी,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बौध्द नगर, लातूर ,गांधी चौकी,लातूर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation** (व्यवसाय):

**(j) Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9049928000

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.**(अ. | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे | **Present Address** (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेख मन्सुर नजीर | | | 1. गरुड चौक लातूर,गांधी चौकी,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (क्र. | Property Category (संपत्ति श्रेणी) | Property Type (सम्पत्ति का | Description (विवरण) | Value(In Rs/-) (मूल्य (रु |
|---|---|---|---|---|

**10. Total value of property (In Rs/-)-सम्पत्ति का कुल मूल्य(रु में):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मृत्यु समीक्षा रिपोर्ट / यू॰डी॰प्रकरण सं., यदि कोई हो ):**

| S.No. (क्र.सं.) | UIDB Number (यू॰डी॰प्रकरण सं.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम** SANJAY Bhimashankar HIBARE(I (Inspector)) / POBN64446 **or**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा** **District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाम):** SANJAY Bhimashankar HIBARE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN64446

पो.ठा. अंमलदार
पो.ठाणे गांधी चौक,लातूर

**फिर्याद** **दिनांक ३०/०६/२०२१**

मी मिलींद ज्ञानोबा कांबळे वय ४७ वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक रा. बौध्द नगर, लातूर मो.नं. ९०४९९२८०००

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन माझे गरुड चौक नांदेड रोड लातूर येथे यश लंच होम नावाचे हॉटेल आहे. मी दिनांक २९/०६/२०२१ रोजी १०.०० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे येवुन पोलीस निरीक्षक काकडे यांना भेटुन माझी एका लोकसेवका विरुध्द तक्रार असल्याचे सांगितले असता त्यांनी सापळा कार्यवाहीसाठी दोन पंच यांना दयानंद कॉलेज लातूरच्या परिसरात बोलावुन घेवुन मी व पोलीस निरीक्षक काकडे व सापळा पथक दयानंद कॉलेज लातूर परिसरात जावुन थांबलो असता सदर ठिकाणी दोन पंच आले त्यावेळी पोलीस निरीक्षक काकडे यांनी माझी व सापळा पथकातील सदस्य तसेच पंचाची ओळख करून देवुन पंचामार्फत माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नांव वरील प्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.

"मी. सप्टेंबर २०१८ पासुन गरूड चौक नांदेड रोड, लातूर येथे सुमीत्राबाई ज्ञानोबा दुडीले यांच्या मालकीच्या जागेत भाडयाने यश लंच होम हॉटेल चालवत असुन जागा मालक यांना ठरल्या प्रमाणे भाडे देतो. माझ्या यश लंच होम हॉटेल मध्ये जागा मालक सुमीत्राबाई ज्ञानोबा दुडीले यांच्या नावाने इलेक्ट्रीक मीटर असुन त्याचे येणारे बील मी स्वत: भरत आहे. व यापुर्वीही भरले आहे. दिनांक २६/०६/२०२१ रोजी मी हॉटेलमध्ये असताना महावितरण कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता शेख साहेब आलें व माझे हॉटेलचे लाईटचे मीटर चेक करुन मला तुम्ही मीटरचा विद्युत प्रवाह काढुन थेट लाईटचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले असुन तुमच्यावर कारवाई होवु शकते असे म्हणुन पंचनामा करुन मला कार्यालयात येण्यास सांगुन निघुन गेले. त्याप्रमाणे मी दि २८/०६/२०२१ रोजी कनिष्ठ अभियंता शेख यांना भेटुन विनाकारण माझेवरती कारवाई करु नका अशी विनंती केली असता त्यांनी मला तुम्ही विज चोरी केलेली आहे तुमच्या कार्यवाही होते पण तुमच्यावर कारवाई करायची नसेल तर मला ३०,०००/– रु दयावे लागतील नाहीतर कारवाई करीन असे म्हणुन लाचेची मागणी केली आहे.

माझ्या वर नमुद कामासाठी कनिष्ट अभियंता यांना लाच देण्याची माझी इच्छा नाही. तसेच त्यांचा व माझा कसल्याही प्रकारचा देण्या घेण्याचा अर्थिक व्यवहार नाही. तरी कनिष्ट अभियंता यांनी माझ्या वर नमुद कामासाठी लाचेची मागणी करुन ती स्वत: अथवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांच्यावर कार्यवाही करावी". ही विनंती आहे. मी संबंधीत कनिष्ट अभियंता यांची मी आज भेट घेणार आहे. अशा आशयाची लेखी तक्रार दिली. व सोबत माझे नावे हॉटेल असले बाबतचे कागदपत्र दिले आहे. मी दिलेली तक्रार ही पोलीस निरीक्षक काकडे साहेब व पंचानी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष–या केल्या आहेत.

पोलीस निरीक्षक काकडे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कनिष्ठ अभियंता शेख यांनी मला माझ्या वर नमुद कामासाठी लाचेची मागणी केली आहे. अगर कसे ? याची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन व ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक काकडे यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरविले व सापळा कार्यवाही बाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना देवुन पोकॉ क्षीरसागर यांना आण्णा भाउ साठे चौकातील महावितरण कार्यालया जवळ माझ्या व पंच कमांक १ पाटील यांचे सोबत जावुन तेथुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन देणे बाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी व पंच कमांक १ पाटील तसेच पोकॉ क्षिरसागर असे मोटार सायकलवर महावितरण कार्यालया जवळ येवुन तेथुन पोकॉ क्षिरसागर यांनी ११.५० वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकविले. मी व पंच कमांक १ पाटील असे माझ्याकडील मोटार सायकलवरुन महावितरण कार्यालया समोर गाडी उभी करुन महावितरण कार्यालयामध्ये कनिष्ठ अभियंता शेख यांचे कॅबीनमध्ये जावुन पंचासमक्ष भेट घेवुन माझ्या कामाच्या अनुषंगाने त्यांच्याशी चर्चा केली की, हं..... सर.... आपलं....यश रेस्टॉरन्टच...बिलाच.... त्यावर कनिष्ठ अभियंता म्हणाले की, बोला की,.....काय म्हणता?...त्यावर मी त्यांना म्हणालो की,.सर....**तिस हजार आमाउंट जरा जास्त व्हत्याय....सर**...तुम्ही म्हणल्या प्रमाण....काल....काल....गि–हाईक काईच नव्हत....काल चार वाजताच बंद कराव लागालय.....गि–हाईकच होईना गेलय काल.... थोड बहुत कंन्सेशन द्या....त्यावर कनिष्ठ अभियंता म्हणाले की...**नाही....जास्त होत...नाही... खरच हो....आमाउंन्ट जास्त होत नाही..... खरच जास्त होत नाही....अस म्हणलं की.....अस बिलींग दिल की.....लय चार्जेस निघतेत.....कारण कस आहे ती.....ऑन रेकॉर्ड गेल की ती....पुन्हा तिकड भरपुर लागत....बिल....** त्यावर मी त्यांना म्हणालो की...**तिस हजार आमाउंन्ट जास्त होत्याय हो सर**...**काई कमी जास्त करा....**त्यावर कनिष्ठ अभियंता म्हणाले की... **आता काय ऐवढयाला बोलाव.... आता....** त्यावर मी त्यांना म्हणालो की... **चालतय मग**.....आज जमलतर थोडया वेळान देतो पैसे....नसता जावुन थोडस चार वाजता येतो मग हॉटेल बंद करुन....त्यावर शेख साहेब म्हणाले की... **चालतय ठिक आहे..... हो... हो...** त्यांनतर मी व पंच कमांक १ पाटील असे पोकॉ क्षिरसागर यांचे जवळ आलो असता पोकॉ क्षिरसागर यांनी

माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद केले. त्यानंतर आम्ही तेथुन दयानंद कॉलजे परिसरात परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक काकडे यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक १ पाटील यांना लाचेची मागणीच्या अनुषंगाने माझ्यात व कनिष्ठ अभियंता शेख यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली त्यावेळी पंच क्रमांक १ पाटील यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी पोलीस कर्मचारी क्षिरसागर यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व कनिष्ठ अभियंता शेख यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच क्रमांक १ यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन कनिष्ठ अभियंता शेख यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे ३०,०००/–रुपये लाचेची रक्कम घेण्याचे मान्य करुन आणुन देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन कनिष्ठ अभियंता शेख यांचे विरुध्द लाचेची सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. पुढील सापळा कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर येथे सर्वानुमते करण्याचे ठरवुन आम्ही सर्वजन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आलो.

पोलीस निरीक्षक काकडे यांनी मला कनिष्ठ अभियंता शेख यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील ५००/–रुपये दराच्या ६० चलनी नोटा असे एकुण ३०,०००/–रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक काकडे यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती सांगुन कर्मचारी यांच्या मार्फत प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ कलवले यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या तोंडाला बांधलेले मास्क डाव्या हाताने काढुन हातात घेणेबाबत सुनियोजीत ईशारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस निरीक्षक काकडे यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवही बाबत सुचना दिल्या. आम्ही सर्वजन आपआपल्या मोटार सायकलवर व तक्रारदार व कर्मचारी तक्रारदार यांच्याकडील स्कुटी मोटार सायकलवर आण्णा भाउ साठे चौक लातूर येथील महावितरण कार्यालयाच्या जवळ येवुन आडबाजुस सर्वांनी व माझी स्कुटी मोटार सायकल उभे केले.

पोलीस निरीक्षक काकडे यांच्या सुचने नुसार पोलीस कर्मचारी क्षिरसागर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १६.३१ वा. चालु करुन माझ्या गळयात आडकविले. मी व पंच क्रमांक १ पाटील असे पायी चालत महावितरण कार्यालयाकडे गेलो. व सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमांक २ निकम असे पायी चालत आले. मी व पंच क्रमांक १ पाटील असे महावितरण विभाग, लातुर येथील कनिष्ठ अभियंता यांची भेट घेण्यासाठी गेलो असता कनिष्ठ अभियंता हे महावितरण विभाग, लातुर चे कंपाउंड भिंतीचे आतुन काही लोकांना बोलत उभे होते. मी व पंच क्र.१ त्याच्या बाजुस जावुन थांबलो. त्यावेळी कनिष्ठ अभियंता शेख मला म्हणाले की, हं... बोला काय म्हणता ?.. असे म्हणाले त्यावर मी त्यांना म्हणालो की, **तुम्ही म्हणल्यासारख तिस हजार आणलेत..** . त्यावर कनिष्ठ अभियंता म्हणाले **आणलेत की ?...बर मग....खंडागळे साहेबाकडं द्या की मग.... राहु द्या मग...खंडागळे साहेबाकडे द्या की मग... खंडागळे साहेबाकड...त्यावर मी** त्यांना म्हणालो की, **खंडागळे साहेबाकड दिउ का ?**...त्यावर कनिष्ठ अभियंता म्हणाले की, **खंडागळे साहेबाकड द्या..... हो... हो**...असे म्हणुन माझे कडील लाचेची रक्कम स्विकारली नाही म्हणुन मी सुनियोजीत लाच स्विकृतीचा ईशारा न करता मी व पंच क्र १ पाटील असे थांबविण्यात आलेल्या मोटार सायकल जवळ परत आलो. सापळा पथकातील सर्व सदस्य ही परत आले असता माझाकडील व्हाईस रेकॉर्डर पोकॉ क्षिरसागर यांनी बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक काकडे यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक १ पाटील यांना लाच स्विकृतीच्या अनुषंगाने माझ्यात व कनिष्ठ अभियंता शेख यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली त्यावेळी पंच क्रमांक १ पाटील यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी पोलीस कर्मचारी क्षिरसागर यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व कनिष्ठ अभियंता शेख यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच क्रमांक १ यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन झालेल्या संभाषणावरुन कनिष्ठ अभियंता यांनी लाचेची रक्कम खंडागळे साहेब यांचेकडे ३०,०००/– रुपये दया म्हटल्या प्रमाणे दोन्ही पंच समक्ष मला लाचेची रक्कम खंडागळे यांना देवु असे म्हणुन खंडागळे कोण आहेत याबाबत मला दोन्ही पंचासमक्ष विचारणा केली असता मी सांगितले की खंडागळे साहेब व मी शेजारी असुन माझे व त्यांचे घरगुती संबंध आहेत. कनिष्ठ अभियंता यांनी सांगितल्या प्रमाणे लाचेची रक्कम खंडागळे साहेब यांचेकडे द्यायची नाही. सदर प्रकरणामध्ये मला त्यांना घ्यायचे नाही. मी उद्या परत कनिष्ठ अभियंता शेख यांची भेट घेवुन त्यांनाच लाचेची रक्कम देउ परंतु मला सदर प्रकरणामध्ये खंडागळे साहेब यांना घ्यायचे नाही असे विनंती दोन्ही पंचासमक्ष पोलीस निरीक्षक काकडे यांचेकडे केली असता माझे विनंती प्रमाणे सदर लाचेची रक्कम कनिष्ठ अभियंता शेख यांना परत उद्या भेटुन देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. व माझाकडील लाचेची रक्कम पोलीस निरीक्षक काकडे यांनी पंच क्रमांक २ यांच्या मार्फतीने काढुन घेवुन एका कागदी पॉकीटमध्ये घालुन सुरक्षीत ठेवली. सदर सापळा कार्यवाही सर्वानुमते स्थगीत करुन ती उदयीक दिनांक ३०/०६/२०२१ रोजी अयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. पोलीस निरीक्षक काकडे साहेब यांनी सर्वाना गोपनियते बाबत सुचना दिल्या.

बी.एच.काकडे

दिनांक ३०/०६/२०२१ रोजी ठरल्याप्रमाणे आम्ही सर्वजन महावितरण कार्यालय जवळ येवुन तेथे पोलीस निरीक्षक काकडे यांनी पुढील सापळा कार्यवाही बाबत योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील लाचेची रक्कमेची पंचामार्फत खात्री करुन माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन कनिष्ठ अभियंता यांना लाच दिल्यानंतर काल सांगितल्या प्रमाणे सुनियोजित इशार सांगुन पोलीस कर्मचारी क्षिरसागर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ११.५२ वा. चालु करुन माझ्या गळ्यात आडकविले. मी व पंच कमांक १ पाटील असे पायी चालत महावितरण कार्यालयाकडे गेलो. व सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमांक २ निकम असे पायी चालत आले. मी व पंच कमांक १ पाटील असे महावितरण कार्यालयामध्ये कनिष्ठ अभियंता यांच्या कॅबीनमध्ये कनिष्ठ अभियंता यांच्या समोर जावुन थांबलो असता कनिष्ठ अभियंता शेख म्हणाले की बोला कांबळे साहेब काय म्हणता त्यावर मी त्यांना म्हणालो की खंडागळे साहेबांची भेट झाली नाही साहेब...हे आणलो होतो....त्यावर कनिष्ठ अभियंता म्हणाले की, **खंडागळे साहेबापशी देवुन टाका की**...म्हणुन माझे कडील लाचेची रक्कम न स्विकारली नाही म्हणुन मी सुनियोजीत लाच स्विकृतीचा ईशारा न करता मी व पंच क्र १ पाटील असे थांबविण्यात आलेल्या मोटार सायकल जवळ परत आलो. सापळा पथकातील सर्व सदस्य ही परत आले असता माझाकडील व्हाईस रेकॉर्डर पोकॉ क्षिरसागर यांनी बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक काकडे यांनी माझ्या समक्ष पंच कमांक १ पाटील यांना लाच स्विकृतीच्या अनुषंगाने माझ्यात व कनिष्ठ अभियंता शेख यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली त्यावेळी पंच कमांक १ पाटील यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी पोलीस कर्मचारी क्षिरसागर यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व कनिष्ठ अभियंता शेख यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच कमांक १ यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री केली. दोन्ही पंचासमक्ष पोलीस निरीक्षक काकडे साहेब यांनी मला पुढील सापळा कार्यवाही बाबत विचारणा केली असता मी सांगितले की, खंडागळे साहेब व मी शेजारी असुन माझे व त्यांचे घरगुती संबंध आहेत. कनिष्ठ अभियंता यांनी सांगितल्या प्रमाणे लाचेची रक्कम खंडागळे साहेब यांचेकडे द्यायची नाही. सदर प्रकरणामध्ये मला त्यांना घ्यायचे नाही. तसेच कनिष्ठ अभियंता शेख यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम माझ्याकडुन ते घेणार नसल्याची माझी पुर्णपणे खात्री झालेली आहे. त्यामुळे कनिष्ठ अभियंता शेख यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करा अशी विनंती केली.

सर्वानुमते पुढील कार्यवाही करण्याची ठरवुन पोलीस निरीक्षक काकडे व दोन्ही पंच तसेच सापळा पथकातील सदस्य असे आम्ही सर्वजन कनिष्ठ अभियंता शेख यांच्या महावितरण कार्यालय लातूर येथील कॅबीनमध्ये येवुन कनिष्ठ अभियंता शेख यांना ताब्यात घेवुन पोलीस निरीक्षक काकडे यांनी सदर सापळा कार्यवाही बाबत कनिष्ठ अभियंता शेख यांना थोडक्यात हकीकत सांगुन त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शेख मन्सुर नजीर वय ३७ वर्षे, पद सहायक अभियंता, वर्ग ३, नेमणुक महावितरण कार्यालय लातूर शहर शाखा कमांक १ रा. गरुड चौक लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक काकडे यांनी माझ्या कामाच्या अनुषंगाने असलेल्या कागदपत्र शेख यांच्याकडुन दोन्ही पंचासमक्ष ताब्यात घेवुन पुढील कायदेशिर कार्यवाही ही लाप्रवि लातूर येथे करण्याचे ठरवुन सहायक अभियंता शेख यांना ताब्यात घेवुन लाप्रवि येथे येवुन पुर्ण केली.

**तरी यातील लोकसेवक शेख मन्सुर नजीर वय ३७ वर्षे, पद सहायक अभियंता, वर्ग २, नेमणुक महावितरण कार्यालय लातूर शहर शाखा कमांक १ रा. गरुड चौक लातूर यांनी दिनांक २९/०६/२०२१ रोजी ११.५५ वा. महावितरण कार्यालय लातूर शहर शाखा कमांक १ कार्यालयात पंचासमक्ष माझ्या यश लंच होम हॉटेलच्या लाईटचे मीटर मधील विद्युत प्रवाह काढुन थेट लाईटचा वापर करुन विज चोरी केली म्हणुन कारवाई न करणेसाठी ३०,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वतः घेण्याचे जाणुन बुजून टाळले आहे म्हणुन माझी सहायक अभियंता शेख यांच्या विरुध्द कायदेशिर तकार आहे.**

मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तकारी ही पोना सुरवसे यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

**बी.एच.काकडे**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,लातूर**